देशदूत
शिल्पकार विकासाचा...
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
01 Sep 2026 - Page 10-1

# ‘के. के. वाघ‘तर्फे रविवारी कार्यशाळा

**नाशिक ।** के. के वाघ शिक्षण संस्था, के. के वाघ फाऊंडेशन, श्री. बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाऊंडेशन, स्माईल व स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पीनच सेंटर ऑफ एक्सलन्स यांचे संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ६) सकाळी ८ वाजता अभियांत्रिकी महाविद्यालय कॅम्पस येथे इको फ्रेंडली गणेशा अर्थात शाडू माती कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी महाविद्यालयाच्या तज्ज्ञ मुर्तीकारांमार्फत शाडू माती पासून गणेशमूर्ती तयार करण्याचे मार्गदर्शन मिळणार आहे. कार्यशाळेस जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी केले आहे.